Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 3.4052 (UIF) [Yr.2014]

ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 7 | Jan - 2016

अशासकीय संघटना आणि महिला सक्षमीकरण

Shraddha S. Soman
Associate Professor & HOD, Dept. of Marathi,
Adarsh College of Arts & Commerce, Kulgaon-Badlapur, Thane,
Maharashtra.

प्रस्तावना :

आपल्या समाजाचा इतिहास बघितला तर गेल्या १५० वर्षांत अनेक लहानमोठे क्रांतिकारक बदल आणि प्रचंड प्रमाणात सुधारणा झालेल्या दिसतात. त्यामुळे आपल्या समाजाचा चेहरामोहराच जणू बदलून गेलेला आहे. समाजामध्ये मोठमोठी स्थित्यंतरे घडून येण्यासाठी जसे राजकीय बदल कारणीभूत ठरतात त्याचप्रमाणे समाजातील विविध संघटनाही समाजाची दिशा बदलवण्याचे कार्य करतात. समाजसुधारणेच्या सर्वच गोष्टी शासन करेल किंबहुना ती शासनाचीच जबाबदारी आहे असे म्हणून चालत नाही. समाजातील संवेदनशील लोकांना आपल्या समाजातील अनेक समस्या दिसत असतात, जाणवत असतात त्या समस्यांवर काही उपाय शोधावा असे त्यांना मनापासून वाटत असते. मग समविचारी लोकं एकत्रित येतात आणि त्यातूनच अशासकीय संघटना (NGO) चा जन्म होतो. अशा संस्थांची नोंदणी शासनाकडे केलेली असते. त्यांच्या कार्याची व्याप्ती सांगणारी एक घटना तयार करुन एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काही वेळेस एखाद्या विशिष्ट ठिकाणी तर काही वेळेस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील या संस्थांचे कार्य सुरू असते.

समाजातील पीडित, शोषित, अन्यायग्रस्त असा जो भाग आहे त्यांच्याकरीता या संस्था सेवाभावी वृत्तीतून काम करीत असतात. कोणत्याही प्रकारचा नफा मिळविणे हे त्यांचे उद्दिष्ट नसते तर त्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव महत्वाची असते. प्रसंगी स्वत:चे पैसे खर्च करुन स्वयंसेवी वृत्तीने या संस्था कार्य करीत असतात. आपल्या कार्यकर्तृत्वामुळे त्या हळूहळू मोठ्या होतात आणि त्यातील संघटितपणामुळे प्रसंगी शासनालाही आपल्या धोरणांविषयी पुनर्विचार करायला भाग पाडतात. समाजहिताचे कायदे करुन घेणे, अन्यायाच्याविरुध्द दाद मागणे हे त्यांचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. अन्यायाविरुध्द वाचा फोडण्यासाठी या संघटना मोर्चे, धरणं, आंदोलन, चळवळी, बहिष्कार अशा अनेकविध शस्त्रांनी शासनाबरोबर लढतात. समाजाला चांगले वळण लावण्याचा प्रयत्न करतात. जिथे शासकीय योजना पोहोचू शकत नाहीत अशा भागांमध्ये या संस्थांचे कार्य सुरू असते. असे म्हणता येईल की, सरकारने दुर्लक्ष केलेल्या अनेक सामाजिक प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा त्या प्रयत्न करीत असतात.

स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे त्यांना त्यांचे अधिकार प्राप्त करुन देणे, स्वातंत्र्य देणे, त्यांच्या मनामध्ये स्वअस्तित्वाची जाणीव निर्माण करणे, अन्यायाविरुध्द संघर्ष करण्यासाठी हिंमत, धैर्य निर्माण करणे होय. त्याचप्रमाणे स्त्रियांचे समाजातील स्थान कौटुंबिक आणि सामाजिक गोष्टींमधील त्यांचा सहभाग, निर्णयस्वातंत्र्य, लिंगसमभाव आणि त्याचबरोबर स्वावलंबनासाठी आवश्यक असणारे तंत्रकौशल्य त्यांना शिकवून सक्षम बनविणे. त्याचबरोबर स्वावलंबनाद्वारे आर्थिक सुरक्षितता त्यांच्यामध्ये निर्माण करणे. या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत या विषयांच्या मूळापर्यंत जाणे गरजेचे आहे. या मध्ये स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे आरोग्य या दोन महत्त्वपूर्ण गोष्टींविषयी जनजागृती करणे हा स्त्रीसक्षमीकरणाचा महत्त्वाचा दृष्टीकोन आहे.

या सामाजिक संस्था युरोप, अमेरिका या देशांमध्ये अस्तित्वात आल्या. भारतामध्येही १९ व्या शतकापासून यांचे अस्तित्व आपल्याला जाणवते. अस्पृश्यता, गुलामगिरी, स्त्रीमुक्ती, बालहक्क, शिक्षण, पुनर्विवाह, विधवाविवाह, स्त्री-पुरुष समानता, अंध-अपंग व्यक्ती, कुष्ठरोगी आणि वृध्द विकलांग यांच्या अनेक समस्यांवर उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या संस्था करीत असतात. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चात्य देशातील नव्या विचारांचे वारे भारतात वाहू लागले आणि त्याची दखल इंग्रज सरकार घ्यावी लागली.

याच काळात महिला स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊ लागल्या आणि त्यांच्या अस्तित्वाची दखल सर्वच समाजाला घेणे भाग पडले. यातूनच स्त्री विषयी जाणीवा निर्माण झाल्या. एवढेच नव्हे तर समाजातील व कुटुंबातील त्यांचे दुर्लक्षित स्थान, शिक्षणाचा आणि स्वातंत्र्याचा अभाव यामुळे खुंटलेला विकास हा आपल्या समाजातील काही नवसुशिक्षितांच्या लक्षात आल्याने प्रथम त्यांनी स्त्रियांच्या सबलीकरणाकरीता एक पाऊल पुढे टाकून सतीची चाल बंद करणे, विधवा पुनर्विवाहास संमती देणे, स्त्री शिक्षणास पाठिंबा देणे अशा त्या काळातील महत्त्वाच्या गोष्टी सुरु केल्या. पुरोगामी हिंदू ब्राह्मो समाजाने स्त्रीशिक्षणाची मोहिम उघडली. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांतून स्त्रीविषयक विविध प्रश्नांना चालना दिली. १८८७ मध्ये भारतीय महिला परिषदेची स्थापना झाली. यामध्ये मुलींची शाळा, विधवांना व्यवसाय, वैद्यकीय मदत, इत्यादी गोष्टींवर लक्ष केंद्रित केले होते. १८८९ मध्ये पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाज ही संस्था स्थापन करुन केडगाव येथे महिलांसाठी शारदासदनची स्थापना केली. १९१० मध्ये सरलादेवी चौधुराणी यांनी भारतीय स्त्री महामंडळाची स्थापना केली. तर बेगम शहा नवाझ यांनी अंजुमन-इ-ईस्लाम ही संघटना स्थापन केली आणि महिलांचे विविध प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. १९१७ ते १९२७ या कालखंडात विमेन्स इंडियन असोसिएशन, द नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन्स इन इंडिया, ऑल इंडिया विमेन्स असोसिएशन, नॅशनल इंडियन असोसिएशन, इत्यादी संस्था निर्माण होऊन संपूर्ण भारतभर महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करीत होत्या. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली नॅशनल इंडियन असोसिएशनचे शिक्षण, मानवसेवा, धर्म याविषयीचे कार्य सुरू होते. त्याचप्रमाणे महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवांसाठी आपल्या संस्थेतर्फे आश्रम उभा केला, त्यांच्या शिक्षणाची सोय केली आणि त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्या सबलीकरणाकरीता विविध संस्था कार्यरत होत्या.

१९७५ ते १९८५ हे संयुक्त राष्ट्रसभेने स्त्रीदशक म्हणून जाहीर केले आणि अनेक स्त्रीसंघटना संपूर्ण भारतभर निर्माण झाल्या. स्त्रीसंघर्ष समिती, सहेली, जागोरी (दिल्ली), स्त्रीमुक्ती संघटना, विमेन्स सेंटर, बलात्कार विरोधी मंच, विमेन ॲण्ड मेडिया (मुंबई), नारी समता मंच, मैत्रिणी, स्त्रीमुक्ती संघटना (पुणे), फोरम अगेन्स्ट ऑपरेशन, तलाकमुक्ती मोर्चा (हैद्राबाद), पेन्नुरामाई इय्यकम (चेन्नई), सेवा, ज्योतिसंघ, स्वमान रक्षा, चिंगारी (अहमदाबाद), सहीयार (बिहार), रुरल विमेन्स लिबरेशन मुव्हमेंट (तमिळनाडू), संचेतना (कोलकाता) अशा विविध अशासकीय संघटनांच्या माध्यमातून स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे कार्य वेगाने सुरू झाले. नारी समता मंच या संघटनेतर्फे 'पुरुष उवाच्' आणि 'मिळून साऱ्याजणी' ही पाक्षिकं देखील निघू लागली. त्यांच्या म्हणण्यानुसार ही स्त्रीवादी चळवळ सामुहिक नेतृत्व, सत्तेचे विकेंद्रीकरण, बिनउतरंडीची समतावादी व्यवस्था मानते. व्यक्तीच्या गुणवत्तेला आणि विकेंद्रीकरणाला वाव देणारी ही व्यवस्था असते. ही संघटना केवळ शहरी स्त्रियांपुरती मर्यादित नाही तर कातकरी आणि आदिवासी स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करणारी आहे. अव्याहतपणे त्यांचे हे कार्य सुरू आहे.

१९७९ मध्ये महाराष्ट्रातल्या अनेक स्त्रीवादी संघटना एकत्र आल्या आणि पुणे येथे जवळपास अडीचशे स्त्रीप्रतिनिधींचे अधिवेशन भरले आणि स्त्रीमुक्ती आंदोलन समिती निर्माण झाली. या समितीच्या अधिवेशनात ८ मार्च हा जागतिक महिला दिन साजरा करावा असे ठरले. तर पुण्यातील मंजुश्री सारडा हत्या प्रकरण तसेच राजस्थानमधील रुपकुंवर सती प्रकरण यांचा पाठपुरावा करावा, त्यांना न्याय मिळवून द्यावा यासाठी व्यापक स्वरुपातील कार्यक्रम हाती घेण्यात आला. बलात्कार, हुंडाबळी, परित्यक्त्यांचे प्रश्न यांचाही पाठपुरावा करण्याचे ठरले. तर १९७० मध्ये हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची महिला आघाडी उभारली. त्यातून तलाकमुक्ती मोर्चाविषयी जनअभियान उभे केले. सर्वात महत्वाचे म्हणजे जुबानी तलाक बंदी, द्विभार्या प्रतिबंध व पोटगीचा हक्क या मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नांना चालना दिली. १९७८ मध्ये स्त्रीमुक्ती संघटनेचा जाहिरनामा प्रसिध्द केला. त्यामध्ये स्त्रीशिक्षणाला तसेच स्त्रीच्या जन्माला महत्त्व देण्यात आले. बहुसंख्य निरक्षर, अडाणी, ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्याकरीता विविध कलापथकं तयार केली. पोस्टर्सचा वापर केला गेला, असंख्य मेळावे भरविले. त्या मेळाव्यांमधून स्लाईड शो दाखविण्यात आले. त्यात 'मुलगी झाली हो' सारखी पथनाट्ये गावोगावी होऊ लागली.

८ मार्च १९८० रोजी डॉ. सीमा साखरे यांनी नागपूर येथे बलात्कार विरोधी मंचाची स्थापना करुन बलात्कारीत स्त्रीला सन्मानाने जगण्याचा हक्क द्यावा आणि बलात्कार करणाऱ्याला कायद्याने कठोर शिक्षा करावी याविषयी चळवळ उभी केली. १९८७ मध्ये संगमनेर येथे ॲड. निशा शिवूरकर यांनी परित्यक्त्या आंदोलन सुरु केले आणि परित्यक्त्या महिलांना हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. १९८२ मध्ये नारी समता मंचातर्फे 'बोलत्या व्हा' हे केंद्र स्त्रियांसाठी सुरू करुन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला त्यांनी या केंद्रातर्फे वाचा फोडावी, त्याच्याविरोधात दाद मागावी असे आवाहन केले. त्याचबरोबर या संघटनेतर्फे 'अपना घर' हेही स्त्रियांकरीता सुरू करण्यात आले आणि मुलींकरीता किशोरी विकास मंचाची स्थापना करण्यात आली. राजस्थानमध्ये भँवरीदेवीवर झालेल्या अन्यायाविरोधात संघर्ष करताना 'साथिन' संघटना उभारली आणि राजस्थानमधील स्त्रियांना एकत्र केलं.

सन २००० नंतर स्त्रियांमध्ये अधिक जागृती झाली, शिक्षणाचा प्रसार झाला. त्यातून अशासकीय संघटनांच्या कामाला वेग आला. 'स्माईल' ही संघटना स्त्रियांचे सक्षमीकरण आणि शिक्षण या दोन गोष्टींकरीता गेली अनेक वर्षे काम करीत आहे. महिलांचे हक्क, त्यांचा आत्मसन्मान मिळवून देणे याकरीता ती संघटना सतत कार्यरत असते. आतापर्यंत एकूण ४७ मुलींना त्यांनी शिक्षणाकरीता स्कॉलरशिप्स मिळवून दिलेल्या आहेत. त्यांनी आतापर्यंत महिलांच्या हक्कांकरीता केलेला संघर्ष आणि कार्य याकरीता 'स्माईल फाऊंडेशनला ICAI CSI Award for Women Empowereent Best CSR Project मिळालेलं आहे. ही संघटना राष्ट्रीय पातळीवर काम करते. जम्मू काश्मिर, चंदीगढ़, दिल्ली, कर्नाटक, राजस्थान इत्यादी अनेक राज्यांमध्ये यांचे विविध प्रकल्प जोमाने सुरू आहेत. स्त्रीसक्षमीकरणाचा एक भाग म्हणून स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी संघटनेतर्फे फिरते हॉस्पीटलची व्हॅन छोट्या-छोट्या गावांमध्ये डॉक्टरांसह फिरत असते. ज्यामुळे गावागावांतून स्त्रियांना आरोग्य विषयक सल्ला आणि औषधे त्यांच्यापर्यंत पोहोचतात.

'स्वाभिमान' ही स्त्री संघटना स्त्रियांकरीता जे काम करते त्या कामाचा २०१२-१३मध्ये ३० हजार स्त्रियांना फायदा झाल्याचे त्यांचा रिपोर्ट सांगतो. या संघटनेने 4S हे मॉडेल तयार केले आहे. ते म्हणजे **S**eeking Health Care as a behaviour, **S**upport through Education, **S**upport from men through male involvement, **S**ustaining change in the community. ही चार उद्दिष्टे आपल्या उपक्रमांमधून राबवित असतात. स्त्रियांचे मुलभूत अधिकार, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि समाजातील सन्माननीय स्थान या गोष्टींवर यांनी लक्ष केंद्रीत केलेले आहे. ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्टनुसार आपल्याकडे ८८ टक्के स्त्रिया या ॲनिमियाच्या शिकार असतात. त्यामुळे स्त्रियांच्या शिक्षण आणि इतर प्रश्नांपेक्षा त्यांच्या आरोग्याकडे या संघटनेने जास्त लक्ष दिलेले आहे.

'NARAD' (National Rural Research and Development Association) ही संघटना १९९९मध्ये स्थापन झाली. ठाणे जिल्ह्यातील काही तरुणांनी एकत्र येऊन विक्रमगड, जव्हार, मोखाडा, भिवंडी इत्यादी भागांमध्ये विविध प्रकल्प राबविण्यासाठी या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचा प्रमुख हेतु ग्रामीण भागामध्ये परिवर्तन

घडवून आणणे, शेती, पाणी पुरवठा, शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण हा आहे. संघटनेचा जलसावरीया प्रकल्प पूर्ण झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी २७ ग्रामपंचायतीमधून विविध महिलांची निवड केली होती. त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले. ज्यामध्ये गांडुळखत प्रकल्प, मेणबत्त्या बनविणे, पापड लोणची बनविणे, पत्रावळी बनविणे, नाचणी सत्व बनविणे, फळांच्या जेली बनविणे इत्यादी गोष्टी शिकविल्या. या प्रशिक्षणानंतर या महिलांनी आपआपले स्वतंत्र व्यवसाय सुरू केले. त्यामध्ये सुक्या मासळीचा उद्योग, भाजीविक्री, गांडुळखत विक्री, सुरु केली. स्थानिक बाजारपेठेबरोबरच वाडा, विक्रमगड, भिवंडी याठिकाणी देखील त्यांची उत्पादने पोहोचली. आपआपल्या खेड्यातील ग्रामसभेमध्येदेखील त्या निर्भयपणे भाग घेऊ लागल्या. आपली मते मांडू लागल्या. आपोआपच स्वाभिमानाने जगू लागल्या.

अशा विविध संघटनाप्रमाणेच ड्रीमगर्ल फाऊंडेशन ही दिल्ली येथे सुरू झालेल्या संघटनेने स्त्रियांना शिक्षण, रोजगार, स्वसंरक्षण याचे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. तर STG (Save the Girl) ही संघटनाही दिल्लीमध्ये कार्य करीत आहे. आजच्या समाजामध्ये प्रामुख्याने निर्माण झालेला भयंकर प्रश्न म्हणजे मुलीच्या जन्माविषयीचा आहे. तिला जन्माला येण्यापूर्वीच नष्ट करण्याची वाईट आणि घातक प्रवृत्ती समाजामध्ये पसरत चालली आहे. त्याविरोधात संघर्ष करण्याचे काम ही संघटना करते. या आणि अशा अनेक संघटनांमुळे आज गर्भजलचाचणी प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला.

एकूणच १९७५ पासून जगातील सर्वच देशांमध्ये स्त्रियांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले गेले आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी अनेक संघटना निर्माण झाल्या. शासकीय पातळीवरील प्रयत्न या करीता अपुरे आहेत हे लक्षात आल्याने व काही महत्वाच्या समस्या शासनापुढे मांडण्यासाठी या संघटना सतत कार्यरत आहेत. एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या चांगल्या माध्यमातून निधी गोळा करुन स्वत:देखील या समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न करीत आहेत . आपण सर्वांनीच अशा संघटनांच्या कार्याची दखल घेऊन शक्य होईल तशी त्यांना मदत करणे ही काळाची मोठीच गरज आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) संदर्भासहीत स्त्रीवाद, स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व, संपादक, वंदना भागवत, अनिल सपकाळ, गीताली वि.म. - शब्द प्रकाशन, पृ.क्र.६४

२) डॉ. वरखेडे मंगला, स्त्रीवादी समीक्षा – संकल्पना आणि उपयोजन

३) साखरे सीमा, स्त्रीवाद

४) संपादक, खोले विलास, ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन

५) भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड प्रकाशन

६) भागवत विद्युत, स्त्रीप्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन

७) संपादक भागवत विद्युत, स्त्री जीवनाची गुंतागुंत

८) सरदार गं.बा., महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल

९) टिकेकर अरुण, कालमिमांसा

१०) डॉ. पाटील शोभा, स्त्रियांची आत्मचरित्रे आणि स्त्रीवादी शोध

११) डॉ. घोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा, स्वरुप आणि उपयोजन

१२) संपादिका राजाध्यक्ष विजया, समीक्षा संकल्पना कोष, खंड ४

१३) संपादिका गणोकर प्रभा, वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोष